

## 'इस्रो'चे शतकी उड्डाण

किसान नेते युद्धवीरसिंग यांनी अर्थसंकल्पाबद्दल बोलताना 'ढाक के तीन पात' म्हणजेच झाडाची तीन पाने अशी टिप्पणी केली आहे. ती या अर्थसंकल्पाचे शेतकऱ्यांबाबतचे सार सांगणारी आहे, असे मला वाटते. या वेळी शेतकऱ्यांना अर्थसंकल्पाकडून आशा होती. ती यासाठी की सरकारनेच आर्थिक पाहणी अहवालात असे म्हटले होते की इतर सर्व क्षेत्रांपेक्षा कृषी क्षेत्र वेगाने वाढत आहे. सरकारला हे मान्य आहे की कोविडच्या महासाथीनंतर लोक पुन्हा शेतीकडे वळू लागले आहेत. त्यामुळे शेतीवरचे अवलंबित्व वाढले आहे. कृषी उत्पादनांची किंमत वाढली आहे, पण शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढलेले नाही. ज्यात सत्ताधारी पक्षाचे बहुमत आहे, अशा संसदीय समितीने सहा आठवड्यांपूर्वी मांडलेल्या आपल्या अहवालात चार शिफारसी केल्या होत्या. त्यातली पहिली अशी की शेतकऱ्यांना सहा हजार रुपये किसान सन्मान निधी मिळतो, तो महागाई लक्षात घेऊन वाढवून दहाएक हजार रुपये केला गेला पाहिजे. दुसरी शिफारस म्हणजे एमएसपीची कायदेशीर हमी दिली गेली पाहिजे. तिसरी शिफारस म्हणजे शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त करण्याची व्यवस्था केली गेली पाहिजे. चौथी शिफारस म्हणजे पीक विमा योजना सुधारली पाहिजे.

या चार कसोट्यांवर हा अर्थसंकल्प पूर्णपणे अपयशी आहे. किसान सन्मान निधी या अर्थसंकल्पात वाढवला जाईल अशी अर्थसंकल्पाआधी माध्यमांमध्ये चर्चा होती. प्रत्यक्षात तसं काहीच झालं नाही. आजपासून सहा वर्षे आधी दरवर्षी सहा हजार रुपये किसान सन्मान निधी म्हणून देण्याची घोषणा झाली होती, त्या सहा हजार रुपयांची किंमत आज तीन हजार रुपये झाली आहे. आणि तेही खते, वीज यांचे जे दर वाढले आहेत, त्यात खर्च होतात.

एसएमएसपी या मुद्द्याचा तर या संपूर्ण अर्थसंकल्पात उल्लेखही केलेला नाही. फक्त सरकार मसूर, तूर आणि उडीद या तीन पिकांची खरेदी सुरू करेल असा उल्लेख करण्यात आला आहे. या पिकांना गेल्या वेळी शून्य टक्के प्रोक्युअर केलं होतं. पण बहुसंख्य शेतकऱ्यांच्या इतर सर्व पिकांचे काय होणार याचा उल्लेखही या अर्थसंकल्पात नाही. कर्जमुक्तीबाबत सरकारने फक्त असे म्हटले आहे की किसान क्रेडिट कार्डावर शेतकऱ्यांना तीन लाखांपर्यंत कर्ज मिळत होते, ते आता पाच लाखांपर्यंत मिळेल. कर्जाची रक्कम वाढणार असेल, तर त्यासाठी सरकार जे अनुदान देते ते मात्र वाढणार नाही. ते तसेच्या तसेच राहणार आहे.

पुढचा मुद्दा पीक विमा योजनेचा. सरकारने त्याची रक्कम वाढवण्याऐवजी कमी केली आहे. आधी ती साडे १५ हजार कोटी रुपये होती ती कमी करून १२ हजार कोटी रुपये केली आहे. गेल्या सहा वर्षांत शेती आणि शेतकरी यांच्यावरचा खर्च भारत सरकार कमी करत चालले आहे. २०१९-२० मध्यें केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पाच्या ५.९५ टक्के एवढा शेती, शेतकरी आणि संबंधित गोष्टींवर खर्च होत होता. २०२१-२२ मध्ये तो ४.०६ टक्के झाला. २०२३-२४ मध्ये तो कमी होऊन ३.१४ टक्के झाला. २५-२६ मध्ये तो आणखी कमी होऊन ३.०६ टक्के झाला आहे. याचा अर्थ गेल्या एक वर्षात केंद्र सरकारचा एकूण खर्च अडीच लाख कोटीने वाढला पण शेती, शेतकरी यासाठी फक्त चार हजार कोटी देण्यात आले. याचा अर्थ शेतकऱ्यांसाठी सरकारने दोन टक्केदेखील दिले नाहीत. जी तरतूद करण्यात आली, तिचा वापर झाला नाही. आणि सरकारचा स्वत:चा अर्थसंकल्प दाखवतो की गेल्या वर्षी सरकारने ज्या घोषणा केल्या त्या प्रत्यक्षात आल्या नाहीत. सरकारने पाच वर्षांपूर्वी अ‍ॅग्रो फंडाची घोषणा केली होती, त्याअंतर्गत पाच वर्षांत एक लाख कोटींचा फंड उभारला जाईल आणि तेवढे पैसे शेतीवर खर्च केले जातील असे सांगण्यात आले होते. त्या घोषणेला या वर्षी पाच वर्षे झाली. पण आत्तापर्यंत फक्त ३६ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. गेल्या वर्षी सरकारने सांगितेल होते की भाज्या आणि फळे यांच्या क्लस्टरसाठी एक योजना आणली जाईल. सहकार क्षेत्रासाठी देशात एक नवीन योजना आणली जाईल. या वेळी सरकारने लेखी कबूल केले आहे की या दोन्ही योजना अद्याप लागू झालेल्या नाहीत. सहा कोटी लोकांच्या जमीनविषयक नोंदी डिजिटलाइज करायच्या होत्या. पण त्यातल्या फक्त नऊ टक्के डिजिटलाइज झाल्या आहेत. १५ हजार ड्रोन आणण्याचे आश्वासन होते, त्यातले आत्तापर्यंत फक्त ५०० आणले गेले आहेत. नव्या नव्या योजनांच्या घोषणा झाल्या आहेत. धनधान्य कृषी योजना जाहीर केली आहे. पण त्यासाठी अर्थसंकल्पात एक पैशाची तरतूद केलेली नाही. हे सगळे म्हणजेच ढाक के तीन पात. शेतकऱ्यांना फक्त डायलॉग मिळतात, पैसे मिळत नाहीत. फक्त मध्यमवर्गाची चर्चा होते. केवळ शहरातल्या लोकांची चर्चा होते. केवळ पगारदार लोकांची चर्चा होते. म्हणजे फक्त संघटित वर्गाचा विचार केला जातो. हा देश घडवणारा मजूर, शेतकरी आजही अर्थसंकल्पाच्या बाहेरच आहे.

# १९ वर्षाखालील महिला क्रिकेट संघाची ऐतिहासिक कामगिरी !

भारतीय पुरुषांचा क्रिकेट संघ इंग्लंड विरुद्ध टी २० मालिका खेळत आहे त्यामुळे संपूर्ण देशाचे आणि मीडियाचे लक्ष त्या संघाकडे लागले असतानाच भारतीय महिला क्रिकेटचा १९ वर्षाखालील संघ मलेशियातील क्वालालंपूर येथे टी २० चा विश्वचषक खेळतोय हे माहीत असणाऱ्या लोकांची संख्या खूप कमी आहे आणि ते साहजिकच आहे कारण आपल्या देशात पुरुषांच्या क्रिकेट संघावर जीव ओवाळून टाकणारे जितके लोक आहेत त्याचा दहा टक्के लोक देखील महिला क्रिकेट पाहत नाही.

महिला क्रिकेटला भारतात कधीच गांभीर्याने घेतले जात नाही. याला मीडियाही अपवाद नाही. मीडिया पुरुष क्रिकेटला जितकी प्रसिद्धी देतात त्याच्या दहा टक्केही प्रसिद्धी ते महिलांच्या क्रिकेटला देत नाही. महिला क्रिकेट संघाच्या सामान्यांना टीव्हीवर थेटपणे दाखवले जात नाही. महिला क्रिकेट संघाला प्रायोजकही मिळत नाही असे असतानाही महिला क्रिकेटपटू मात्र आपले काम इमाने इतबारे करून देशाचा गौरव वाढवण्याचा प्रयत्न करतात. आता हेच पहा ना पुरुषांची इंग्लंड विरुद्ध द्विपक्षीय मालिका चालू असताना भारत या मालिकेत कशी कामगिरी करतो याकडे सर्वांचे लक्ष लागले होते मात्र मलेशियातील क्वालालंपूर येथे माहिलांचा १९ वर्षाखालील टी २० चा विश्वचषक चालू होता हे किती लोकांना माहीत होते ? याच विश्वचषक स्पर्धेत भारताच्या १९ वर्षाखालील महिलांनी अजिंक्यपद मिळवून विश्वक्रिकेटवर आपली



मक्तेदारी सिद्ध केली. क्वालालंपूरच्या बायुमास ओव्हल येथे झालेल्या अंतिम सामन्यात भारताच्या १९ वर्षाखालील महिलांनी जबरदस्त खेळ करत दक्षिण आफ्रिकन महिला संघाचा धुव्वा उडवत विश्वचषकावर भारताचे नाव कोरले. अंतिम सामन्यात भारतीय महिलांनी जबरदस्त गोलंदाजी करून दक्षिण आफ्रिकेला अवघ्या ८२ धावत गुंडाळून अवघ्या ११.२ षटकात ८४ धावा काढून ९ गडी राखत एकतर्फी विजय मिळवला. अंतिम सामन्यात भारतीय महिलांनी एकहाती वर्चस्व गाजवले. गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर भारतीय महिलांनी हुकूमत गाजवून दक्षिण आफ्रिकन महिलांना दाती तृण धरायला लावले. हा सामना जिंकून भारतीय महिलांनी सलग दुसऱ्यांदा विश्वचषकावर नाव कोरले. कोणत्याही स्तरावरील भारतीय महिला क्रिकेट संघाचे हे केवळ दुसरे विश्वविजेतेपद आहे. याआधीच्या म्हणजे २०२३ साली झालेल्या १९ वर्षाखालील महिलांच्या टी २० विश्वचषक स्पर्धेत भारताच्या १९ वर्षाखालील मुलींनी इंग्लंडचा पराभव करून विश्वविजेतेपद मिळवले होते. सलग दोनदा विश्वचषकावर नाव कोरणाऱ्या भारताच्या या १९ वर्षाखालील मुलींची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच आहे. विशेष म्हणजे भारताच्या वरिष्ठ महिला संघाला अजूनही अशी कामगिरी करता आलेली नाही. भारताच्या वरिष्ठ महिला संघाने एकदिवसीय व टी २० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात प्रवेश केला होता मात्र दुर्दैवाने त्या संघाला विश्वविजयाला गवसणी घालण्यात अपयश आले होते मात्र भारताच्या या युवा महिला खेळाडूंनी ही अशक्य वाटणारी कामगिरी शक्य करून सर्वांनाच चकित केले आहे. भारताच्या या १९ वर्षाखालील महिला संघाची ही कामगिरी ऐतिहासिकच आहे. भारताच्या या युवा महिला खेळाडूंच्या या कामगिरीचा देशातील १४४ कोटी जनतेला सार्थ अभिमान आहे. महिला क्रिकेटसाठी हा क्षण सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यासारखा आहे. महिला क्रिकेटला उर्जितावस्था देणारा हा विजय आहे. पुरुष क्रिकेटमध्ये जे कपिल देवच्या संघाने १९८३ साली केले होते तेच निक्की प्रसादच्या या संघाने करून दाखवले आहे. सलग दुसऱ्यांदा टी २० चा विश्वचषक जिंकून भारताच्या या युवा महिलांनी इतिहास घडवला आहे. भारताच्या या युवा खेळाडूंनी भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवला आहे. वास्तविक भारताच्या वरिष्ठ महिला संघाने देखील देशासाठी अनेकदा अप्रतिम कामगिरी केली आहे असे असूनही भारतीय महिला क्रिकेटला देशात अजूनही गांभीर्याने घेतली जात नाही. जितकी लोकप्रियता पुरुषांच्या क्रिकेटला मिळते तितकी महिला क्रिकेटला मिळत नाही ही दुर्दैवाची बाब आहे. या विजेतेपदानंतर तरी देशात महिला क्रिकेटला गांभीर्याने घेतले जाईल अशी आशा करूया. सलग दुसऱ्यांदा टी २० च्या विश्वचषकावर भारताचे नाव कोरून इतिहास घडवणाऱ्या १९ वर्षाखालील भारतीय महिला क्रिकेट संघाचे मनापासून अभिनंदन! जय हो!!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# अभ्यासपूर्ण व्याख्यान संवादातून कवठे येथील श्रमसंस्कार शिबीर संपन्न

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१, खंडाळा (सातारा) :** राजेंद्र उच्च माध्यमिक विद्यालय,सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय, खंडाळा दोन्ही शैक्षणिक संस्थाचे कवठे(जवळे) येथील दि. २४ ते २९ जानेवारी २०२५ अखेरचे विशेष श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले.शिबिराचे उदघाटन खंडाळा विभाग शिक्षण समितीचे सचिव अनिरुद्ध गाढवे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.दि २५ ते २८ जानेवारी अखेर प्रबोधन अभ्यासपूर्ण व्याख्यान-संवाद मध्ये ज्ञान प्रबोधिनी नेतृत्व विकास केंद्राच्या पुणे जिल्हा समन्वयक राजेश्वरी मंडगे यांनी नेतृत्व कौशल्ये आणि सामाजिक जाणीवा याबद्दल विद्यार्थी व गावकऱ्यांशी संवाद साधत आपले विचार व्यक्त केले.

समुपदेशक सौ. अनुष्का कजबजे यांनी कचरा व्यवस्थापन यावर शोत्यांना कचरा व्यवस्थापन फायदे तोटे यावर विवेचन केले.महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी रोहित कुंभार यांनी जलसंवर्धन चे महत्व यावर आपली मते व्यक्त केली. ज्येष्ठ राज्यशास्त्र अभ्यासक प्रा.रमेश डुबल यांनी राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांच्या जीवनचरित्र याबद्दल अभ्यासपूर्ण मांडणी केली. दि.२६ जानेवारी २०२५ रोजी ७६ वा प्रजासत्ताक दिन



उत्साहाने साजरा करण्यात आला. कवठे प्राथमिक शिक्षिका ससाणे यांनी व्यक्तिमत्व विकास आणि गड भ्रमंती यावर संवाद साधला.इंडस ह्युमिनिटी फौंडेशन संस्थापक अध्यक्ष ब्रेझनेव्ह ढमाळ यांनी सेंद्रिय शेतीचे महत्व यावर श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. युवकांच्या उत्तम आरोग्य संवर्धनासाठी दरदिवशी योग प्रशिक्षण घेण्यात आले. श्रमदान,स्वच्छता, आरोग्य जन-जागृतीसाठी प्रबोधनसाठी विद्यार्थ्यांनी गावातून फेरी काढली.शिरवळ येथील कमलाबेन मेहता नेत्र रुग्णालयाचे समन्वयक सुनिल कुलकर्णी व टीम वतीने नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले. यासोबत सांस्कृतिक कार्यक्रम माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या सुप्त कलेचे दर्शन घडविले. प्राथमिक आरोग्य केंद्राकडून यासोबत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. युवकांनी नॉट मी बट यु तत्वाचा अंमल कृतीतून दरदिवशी सिद्ध केला.

प्रामुख्याने स्वयंशिस्त, सहकार्य,कष्ट,समूहशक्तीतून सामाजिक परिवर्तन या सूत्राआधारे कवठे गावात स्वच्छता, जलसंवर्धन साठी बंधारा बांधणी नैसर्गिक संवर्धन साठी वृक्षारोपण केले. या विधायक कार्यात ग्रामपंचायत कवठे सर्व आजी माजी पदाधिकारी, सदस्य, पोलीस पाटील, ग्रामसेवक,ग्राम महसूल अधिकारी, विविध विकास सोसायटी संचालक, ग्रामस्थ, मुख्याध्यापक व शिक्षक जि. प.प्राथमिक शाळा व शाळा व्यवस्थापन समिती अशा सर्व क्षेत्रातील मान्यवरांचे विशेष सहकार्य व मदत मिळाली.२९ जानेवारी २०२५ रोजी जि.प.प्राथमिक शाळा, कवठे चे मुख्याध्यापक सोमनाथ बांगर व अंगणवाडी सेविका वनमाला थोपटे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रमसंस्कार शिबिराचा समारोप करण्यात आला.

## विमा भरोसा..

ऐरणी वरचा विषय
सतावी पीक विमा
विमा धारक बिचारे
हो तया भुगा खिमा

किस्से असेअसंख्य
अगाध विमामहिमा
गोंधळात टाके पुरा
मुळी संपेना वहिमा

स्किम रे कुणासाठी
वाढवत ठेवे संभ्रमा
सद्उद्देश बाजू राही
काळिमा रे उपक्रमा

कागदपत्रे जंजाळात
सहन करतो जुलमा
अडचणी सामना करे
क्लिष्ट कठिणकलमा

गुन्ह्या मागून ते गुन्हे
पुन्हा होत राहे जमा
राजकीयपोळी भाजे
कुणी मागे राजीनामा

पिडलाजाई पोशिंदा
इथेअसे कुणासतमा
मूळ उदात्त उद्देशाचा
करुन टाकी खातमा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत उदयगिरीचे सुवर्ण यश ; शुभम मोतीपवळे यांना सुवर्णपदक

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२, उदगीर (लातूर) :** उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील शुभम विरभद्र मोतीपवळे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी २०२४ परीक्षेमध्ये विद्यापीठात बी.कॉम. तृतीय सर्वप्रथम आल्याबद्दल कै. धनाजीराव सदाशिवराव बिरादार पुरस्काराने प्रशस्तीपत्रक व सुवर्णपदक देऊन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते २७व्या दीक्षांत समारंभात सन्मानित करण्यात आले. तसेच





स्नेहा गुणवंत हलकुडे वनस्पतीशास्त्र या विषयात बी.एस्सी. तृतीय वर्षात सर्वाधिक गुण घेऊन विद्यापीठात प्रथम आली आहे. त्याबद्दल तिला प्रा. डी. एस. मुकादम पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.

त्यांच्या या यशाबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी, उपाध्यक्ष डॉ. रेखा रमण रेड्डी, सचिव रामचंद्र तिरुके, सहसचिव अ‍ॅड. एस. टी. पाटील, डॉ. रामप्रसाद लखोटिया, कोषाध्यक्ष भालचंद्र चाकूरकर, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, उपप्राचार्य डॉ. सुधाकर पाटील यांनी अभिनंदन केले. शुभम मोतीपवळे या गुणवंत विद्यार्थ्याला वाणिज्य विभाग प्रमुख बालाजी होकरणे, डॉ. संतोष घोंगडे, प्रा. गजानन पळनाटे, प्रा. कौशल म्हेत्रे, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.राहुल अलापुरे, डॉ.विनय नागपूर्णे यांचे मार्गदर्शन लाभले.

# आजारपणावर मात करीत साईराजला वेटलिफ्टिंगमध्ये कांस्य

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, डेहराडून :** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार्या नाशिकच्या साईराज परदेशी याने वेटलिफ्टिंग मधील ८१ किलो गटात कांस्यपदकाची कमाई केली. या स्पर्धेतील त्याचे पहिलेच पदक होय.

एक आठवड्यापूर्वी तापाने आजारी असलेल्या आणि पाठीतील दुखण्याने त्रस्त असलेल्या साईराज याने आज येथे आत्मविश्वासाने कौशल्य दाखविले. साईराज या १७ वर्षीय खेळाडूने स्नॅचमध्ये १४१ किलो तर क्लीन व जर्कमध्ये १७० किलो असे एकूण ३११ किलो वजन उचलले. मध्यप्रदेशच्या व्ही. अजय बाबू याने ३२२ किलो तर पश्चिम बंगालच्या अचिंता शेऊली याने ३१३ किलो वजन उचलून अनुक्रमे सुवर्णपदक व



रौप्यपदकाची कमाई केली. साईराज याने डिसेंबर महिन्यात झालेल्या कनिष्ठ गटाच्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. येथेही त्याला सुवर्णपदकाची अपेक्षा होती. मात्र एक आठवड्यापूर्वी त्याला ताप आला होता तसेच पाठीतही उसण भरली होती. त्यामुळे येथे तो सहभागी होईल की नाही याबाबत शंका निर्माण झाली होती. तथापि पतियाळा येथे राष्ट्रीय प्रशिक्षण केंद्रात (एनसीओई) सराव करणार्या साईराज याला तेथील प्रशिक्षक अल्केश बारूआ यांनी जमेल तसा प्रयत्न करीत राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत कामगिरी करावी असा सल्ला दिला. त्यामुळेच तो येथे सहभागी झाला आणि महाराष्ट्राच्या खात्यात त्याने आणखी एका पदकाची भर घातली. साईराजने खेलो इंडिया क्रीडा स्पर्धा, विविध वयोगटातील राष्ट्रीय स्पर्धांमध्ये अनेक पदके जिंकली आहेत.आजारपणामुळे या स्पर्धेत सहभागी होईल की नाही याबाबत साशंक होतो तथापि माझे प्रशिक्षक अल्केश बारूआ यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे मी येथे सहभागी झालो आणि कांस्यपदकापर्यंत पोहोचलो. हे कास्यपदक माझ्यासाठी आगामी करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे असे साईराज याने सांगितले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पिस्तुलात बिघाड होऊनही २५ मीटरमध्येराही सरनोबत नेमारली बाजी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, उत्तराखंड :** आजारपणामुळे जवळजवळ २ वर्षे स्पर्धात्मक नेमबाजीपासून दूर असलेली कोल्हापूरची सुवर्णकन्या राही सरनोबतने ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील सोनेरी वेध घेत शानदार पुनरागमन केले. सातव्या फेरीत राहीच्या पिस्तुल बिघाड होऊनही संयमी खेळ करीत तिने सुवर्ण यशाचा अचूक निशाणा घेतला. महाराणा प्रताप क्रीडा संकुलातील त्रिशुल शूटिंग रेज राहीच्या यशाने जय महाराष्ट्राने दुमदुमली. अनुभवी राहीने २५ मीटर पिस्तुल प्रकारातील अंतिम लढतीत ३५ गुणांनी सुवर्णपदकाचा वेध घेतला. सुरुवातीला पिछाडीवर असलेल्या राही हिने चौथ्या फेरीपासून आघाडी घेतली. सातव्या फेरीत राहीच्या पिस्तुलात थोडासा तांत्रिक बिघाड झाला होता. त्याकडे दुर्लक्ष करीत तिने शेवटपर्यंत संयम दाखवित सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. या तांत्रिक बिघाडाच्या वेळी सिमरन हिने राही हिला मागे टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र राहीने पिस्तुलाच्या बिघाडानंतरचे दोन्ही नेम अचूक साधले आणि आपली विजयी आघाडी कायम ठेवली.

राहीच्या सोनेरी पुनरागमनाचा आनंद पदक वितरण समारंभात ही प्रकटला.

महाराष्ट्रातील चाहत्यांनी जय भवानी, जय शिवाजीचा जयघोष करीत तिचे अभिनंदन केले. अनेक दिवसांनंतर यश मिळतयं याचा आनंद असला, तरी आशियाई व राष्ट्रकुल स्पर्धेसाठी माझी तयारी सुरू आहे. माझ्या खेळात काही बदल करून आता देशासाठी पदक जिंकण्याचे माझे ध्येय असेल, असे राहीने सांगितले. समरन प्रीत कौर ब्रार (पंजाब) व टी.एस.विद्या (कर्नाटक) यांना अनुक्रमे रौप्य व कांस्यपदक मिळाले. महाराष्ट्राच्या रिया थत्ते हिने चौथा क्रमांक पटकाविला. जुलै २०२२ ते मे २०२३ या कालावधीमध्ये कोरोनाच्या आजारपणामुळे एक वर्षे राही ही पूर्णपणे अंथरुणावरच होती. त्यावेळी तिची नेमबाजीची कारकीर्द संपुष्टात येणार की काय अशी भीती निर्माण झाली होती. ऑक्टोबर २०२३ पासून तिने सुरुवातीला काही मिनिटे सराव सुरू केला त्यानंतर तिने सन २०२४ ऑलिंपिक मध्ये प्रवेश मिळवण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, ही संधी हुकल्यानंतर तिने पुन्हा आपल्या तंदुरुस्तीवर अधिक लक्ष केंद्रित केले.

गतवर्षापासून राहीने आपल्या तांत्रिक कौशल्यामध्ये परिपूर्णता आणण्यावर भर दिला. त्यामुळेच तिला येथे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत अव्वल यश मिळवता आले. ती सध्या पुण्यातील बालेवाडीत सराव करीत आहे. २०११ मध्ये रांची येथे झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत तिने पहिल्यांदा भाग घेतला होता. त्यानंतर आजपर्यंत तिने अनेक पदके जिंकली आहेत. आय एस एस एफ जागतिक चषक मालिकांमध्ये ४ सुवर्ण, एक रौप्य व २ कास्य पदके तिने जिंकली आहेत. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत दोन सुवर्ण व एक रौप्य, तर आशियाई क्रीडा स्पर्धेमध्ये एक सुवर्ण व एक कांस्यपदक अशी तिने कमाई केली आहे. दोन वेळा तिने ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले आहे.

## कुंडलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्र सलाईन वर...

### एकाच वैद्यकीय अधिकाऱ्यावर भार; अनेक कर्मचाऱ्यांची पदे रिक्त




**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०२, कुंडलवाडी (नांदेड) :** येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदामुळे उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यावर अनेक विभागाचा अतिरिक्त कामाचा भार येत असल्याने वेळेवर आरोग्य सुविधा मिळण्यास अडचणी निर्माण होत असून दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी एकच वैद्यकीय अधिकारी सध्या कार्यरत असून एक वैद्यकीय अधिकारी पदासह अनेक कर्मचाऱ्यांची पदे ही रिक्त असल्याने कुंडलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्र सलाईनवर असून आरोग्य केंद्र असून अडचण नसून खोळंबा अशी अवस्था आरोग्य केंद्राची झाली आहे. याकडे जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी होत आहे. बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी हे सर्वात मोठे गाव असून येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत कुंडलवाडी शहर तसेच माचनूर, हुनगुंदा, आरळी, अर्जापूर, पिंपळगाव (कुं) या ५ उपकेंद्रांचा समावेश होतो. या आरोग्य केंद्रांतर्गत असलेल्या २४ गावांतील ३२ हजार व कुंडलवाडी शहरातील जवळपास १६ हजार रुग्णांच्या आरोग्य सेवेचा भार या केंद्रावर अवलंबून आहे. कुंडलवाडी शहर ही मोठी बाजारपेठ असून आठवड्यात मंगळवार व शुक्रवार दोन दिवस बाजार भरतो. या आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्णांची संख्या ही मोठी आहे. परंतु या आरोग्य केंद्र व उपकेंद्रात मंजूर २९ पदांपैकी एका वैद्यकीय अधिकाऱ्यांसह ९ कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यावर अतिरिक्त ताण पडत येत आहे. एकाच वैद्यकीय अधिकाऱ्यावर प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू आहे. त्यामुळे रुग्णांना वेळेवर सेवा मिळण्यास अडचणी निर्माण होत असून रुग्णांची मोठ्या प्रमाणात हेळसांड व गैरसोय होत आहे. सध्या वातावरणातील बदलामुळे सर्दी, खोकला, ताप, विषमज्वर आदी आजारांचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आरोग्य केंद्रात येत आहेत. रोज २०० ते २५० ओपीडी रुग्णांची संख्या आहे. एकच महिला वैद्यकीय अधिकारी कार्रत असून प्राथमिक आरोग्य केंद्राचा कारभार सुरू असून आरोग्य केंद्र अंतर्गत असलेल्या उपकेंद्रातील समुदाय आरोग्य अधिकारी हे उपकेंद्र सोडून प्राथमिक आरोग्य केंद्रात सेवा देत असल्याने उपकेंद्र अंतर्गत येणाऱ्या पाचही गावातील नागरिकांना आरोग्य सेवा वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. त्यातच एकच महिला वैद्यकीय अधिकारी असल्याने त्या शासकीय बैठका प्रशिक्षणासाठी गेल्यास रुग्णांची मोठ्या प्रम ाणात गैरसोय होत आहे.

## विंचूर येथे राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन शिबिर संपन्न



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०२, विंचूर (नाशिक) :** राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम दिनांक ०७ डिसेंबर २०२४ पासून ते दिनांक २४ मार्च २०२५ अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र निमगाव वाकडा, अंतर्गत आयुर्वेदिक दवाखाना विंचूर येथे १०० क्ष किरण कॅम्प घेण्यात आला. त्यावेळी विंचूरचे सरपंच सचिन दरेकर, वैद्यकीय अधिकारी डॉ.अविनाश पाटील, डॉ.वरुणराज ठाकरे, तुषार शिंदे, क्षयरोग सुपरवायझर नरहरी सानप व आरोग्य निरीक्षक चंद्रभान धोंडे, एक्स रे टेक्निशियन, आरोग्यसेवक आरोग्य सेविका, आशा सुपरवायझर, आशा सेविका, मदतनीस व लाभार्थी उपस्थित होते. एकूण १०४ लाभार्थ्यांची क्ष किरण तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ३ संशयित आढळून आले.

## आमदार जितेंद्र आव्हाडांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिली अंडी

### विद्यार्थ्यांच्या मध्यान्ह भोजनातून अंडी गायब झाल्याने केला अनोखा निषेध





**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०२, ठाणे :** राज्य शासनाकडून शालेय विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन दिले जाते. या मध्यान्ह भोजनात पोषक तत्त्वांचा समावेश असावा, असा दंडक आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून या पोषण आहारातून अंडी गायब झाली आहेत. या पोषण आहारातील अंड्यांसाठी वर्षाला ५० कोटींची तरतूद करण्यात सरकार अपयशी ठरले असल्याचा आरोप करीत राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा विधिमंडळ गटनेते डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य सरकारला अंडी पाठवून अनोखा निषेध केला. मध्यान्ह भोजन योजना ही भारतातील शालेय भोजन कार्यक्रम आहे. या योजनेअंतर्गत, सरकारी आणि सरकारी अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत जेवण दिले जाते.

या योजनेचे उद्दिष्ट शाळेतील विद्यार्थ्यांची पोषण स्थिती सुधारणे हा असून १५ ऑगस्ट १९९५ पासून या योजनेचा प्रारंभ झाला आहे. नोव्हेंबर २०२४ मध्ये राज्याच्या शिक्षण विभागाकडून विद्यार्थ्यांना नियमित आहाराव्यतिरिक्त आठवड्यातून एक दिवस अंडी देण्यात येणार आहेत.

जे विद्यार्थी अंडी खात नाहीत त्यांना केळी दिली जाणार आहेत. या निर्णयानुसार शालेय विद्यार्थ्यांना बुधवारी किंवा शुक्रवारी उकडलेले अंडे अथवा अंडा पुलाव, बिर्याणी अशा स्वरूपात आहार देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, आता त्यासाठी वर्षाला ५० कोटी रूपयांची तरतूद करण्यास सरकार असमर्थ असल्याने अंडी, मिष्टान्न देण्यात येणार नाहीत.

त्याचा निषेध करण्यासाठी डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाध्यक्ष सुहास देसाई, कार्याध्यक्ष प्रकाश पाटील, महिला जिल्हाध्यक्षा सुजाता घाग, महिला कार्याध्यक्षा सुरेखाताई पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांची भेट घेऊन त्यांना अंडी दिली. ही अंडी राज्य सरकारला पाठविण्यात यावी, असे ही त्यांनी यावेळी सांगितले.

## खारफुटीच्या जीवावर उठले 'कचरा माफिया'

### खाडी परिसरावर अतिक्रमणासाठी माफियांचा खटाटोप; दिव्याच्या खाडी किनारी खार्डी जवळ कचऱ्याची होळी



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०२, दिवा (ठाणे) :** कल्याण ग्रामीण भागाला मोठा खाडी किनारा लाभला आहे. मात्र या खाडी किनाऱ्यावर असणाऱ्या खारफुटी वनस्पती भू माफियांच्या नजरेत पडल्या आहेत. खारफुटीवर चक्क कचरा टाकून ते पेटविण्याची सत्र सुरु झालं आहे. शिळ दिवा रोड वरील खार्डी पासून या प्रकारा सुरुवात झाली आहे. त्यामुळे एकीकडे खारफुटी संवर्धनासाठी शासन तत्परतेनं काम करत असताना सुरु असलेल्या या प्रकारामुळे पर्यावरण प्रेमींकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

कल्याण ग्रामीण भागातील दिवा विभागात सर्वाधिक खारफुटी जंगल दिसून येतो. मात्र या जंगलावर सध्या भू माफियांची नजर पडल्याने या जंगलाचे अस्तित्व धोक्यात आलं आहे. विशेष म्हणजे या सुरु असलेल्या अनागोंदी कारभारामुळे या परिसरात असणारे वन्य जीवांचे अस्तित्व कमी होत चाललं असल्याचे स्थानिक सांगत आहेत. शासनाकडून खारफ ुटी संवर्धनासाठी कोणत्याही प्रकारच्या शासनाकडून उपायोजना केल्या जात नाहीत. त्यामुळे दिवा परिसरात खाडी किनारी शहरातील कचरा टाकून ते पेटवून देण्याचे प्रकार वाढत चाललं आहेत. विशेष बाब म्हणजे खाडी किनाऱ्यावरील या खारफुटीच्या संवर्धनासाठी अधिवेशनात आवाज देखील उठविण्यात आले होते. मात्र अधिवेशनात लेखी उत्तर दिल्यानंतर पुढे खाडी किनारी असणाऱ्या खारफुटींवर अतिक्रमण सुरूच राहत असल्याचे दिसून येत आहे. विशेष बाब म्हणजे या अतिक्रमणांमुळे या खारफुटीच्या परिसरात वर्दळ असणाऱ्या कोल्ह्यांची वर्दळ दिसेनाशी झाली आहे. तर पक्ष्यांची वर्दळ देखील कमी होत चाललं आहे. मात्र लोकप्रतिनिधींसह प्रशासकीय यंत्रणा याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे.

## कृषी विद्यापीठाच्या प्रकल्पग्रस्तांना मिळणार नोकरीचा लाभ - खा.लंके



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, अहिल्यानगर :** राहुरी येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठासाठी जमिनी अधिगृहीत करण्यात आल्याने प्रकल्पग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्तांचे दाखले देण्याचा मार्ग शासन निर्णयामुळे मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे राहुरी व परिसरातील २०० तरूणांना नोकरीचा लाभ मिळणार असल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली. या निर्णयासाठी आपण गेल्या २ वर्षांपासून राज्य शासनाकडे पाठपुरावा करत होतो, असे त्यांनी सांगितले. या प्रकल्पग्रस्तांनी दाखल्यासाठी जिल्हा पुनर्वसन अधिकारी शाहूराव मोरे यांच्याकडे पाठपुरावा केला होता. मात्र त्यांनी प्रकल्पग्रस्तांचे दाखले फेटाळले होते. २ वर्षांपूर्वी राहुरी कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक मधुकर पवार, विकास भिंगारदे, भूषण शेंडगे, जगदीश अडसुरे, कुणाल कर्डक, आरबाज शेख, रवींद्र गिरगुणे आदींनी तत्कालीन आम दार नीलेश लंके यांच्याकडे या प्रश्नाचे गाऱ्हाणे मांडले. लंके यांनी याप्रश्नी तत्कालीन मदत व पुनर्वसन मंत्र्यांची भेट घेऊन या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी साकडे घातले होते. खासदार निलेश लंके यांच्या पाठपुराव्यादरम्यान या प्रकल्पग्रस्तांसाठी स्वतंत्र शासन आदेश काढावा लागेल असे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत होते. राज्यात नवे सरकार सत्तेवर आल्यानंतर खासदार लंके यांनी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांच्याशी चर्चा करून या प्रश्नात तोडगा काढण्याची मागणी केली. मंत्री जाधव पाटील यांना तसे निवेदनही सादर केले होते.

## वारकरी गुरुकुल आश्रम निर्मितीस चंद्रकांत यादवांची १ लाख रु.देणगी



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०२, खंडाळा (सातारा) :** खंडाळा तालुक्यातील लोहम - झगलवाडी परिसरात उभारण्यात येत असलेल्या अनाथ बाल अबालवृद्ध निराधार वारकरी गुरुकुल आश्रमास खंडाळा पंचायत समिती सदस्य चंद्रकांत यादव यांनी सदिच्छा भेट दिली. तसेच कामकाजाची पाहणी केली. आपल्या परीसरात उभा राहत असलेला हा आश्रम निराधार अबाल वृध्द यांच्यासाठी भविष्यात भक्कम आधारस्तंभ असेल अशा शब्दांत त्यांनी कौतुक केले.रस्ता विज पाणी यासंदर्भात योग्य मार्गदर्शन केले व सहकार्य ही करण्याचे वचन दिले.

आश्रम उभारणीसाठी १ लाख रुपये देणगी देत चंद्रकांत यादव यांनी आपल्यातील सेवाभावी वृत्ती दाखवत समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. राजकारणापलीकडे जाऊन सतत लोकांच्या आडी अडचनीला धावून जाणे व सामाजिक उपक्रमात अग्रेसर राहणे हा चंद्रकांत यादव यांचा स्थायी भाव पुन्हा एकदा पाहायला मिळाला. यावेळी बोलताना यादव साहेब म्हणाले की, भविष्यात देखील या आश्रम निर्मितीत काही मदत लागली तरी हक्काने सांगावे ती ही पुर्ण केली जाईल अशी हमीदेखील यावेळी त्यांनी दिली. याप्रसंगी लोहोम, झगलवाडी, कर्नवडी, घाडगेवाडी, लिंबाचीवाडी आदी गावातील मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते. विकास सेवा सोसायटी संचालक आदर्श शहा यांनी पंचायत समिती सदस्य मा.चंद्रकांत यादव साहेब यांचा यथोचित सन्मान सत्कार केला. हरी भक्त परायण आदिनाथ म ांढरे महाराज यांनी स्वागत केले. तर हरी भक्त परायण तानाजी शिंदे महाराज यांनी आभार मानले.

यावेळी लोहोम गावचे विकास सेवा सोसायटी संचालक संतोष रामचंद्र गायकवाड (चिंतुआण्णा), आदर्श शहा व सन्माननीय अमोल दादासाहेब गायकवाड (बावड्या), चांगदेव मांढरे, विठू नाना, गायकवाड दादासाहेब, शिरावळे बाळासाहेब पाडळे, हरी भक्त परायण रघुनाथ जाधव (कर्नवडी), महेश दादा शेडगे (घाडगेवाडी), माजी सरपंच भरत गुलाबराव लिमण (झगलवाडी), भैरवनाथ भजनी मंडळ अध्यक्ष शरद विष्णू लिमण (झगलवाडी), पैलवान सुनील बाबासो, लिमण झगलवाडी, रमेश एकनाथ सुतार, झगलवाडी लिंबाची वाडी नितिन काळुराम, कासुर्डे पोलिस पाटील संदिप मांढरे, पोपट कासुर्डे, ज्ञानेश्वर कासुर्डे, गुजाबा कासुर्डे, आत्म ाराम मांढरे, सोपान मांढरे, तानाजी हजारे, फौजी प्रशांत हिरवे, रोहीदास मांढरे व इतर ही मान्यवर उपस्थित होते. सर्वांचे स्वानंद प्रभा फाउंडेशनच्या वतीने आभार मानण्यात आले.

